# हैं तय्यार हम...

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE 21km
17 Dec 2017
Associate Sponsor riso 100% Ricebran Oil
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon



**सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल...** (डावीकडून) प्रदीप पवार, मुकेश अहिरराव, एम. ए. खान, लक्ष्मीनारायण बाविस्कर, डॉ. आनंद डंक, डॉ. विराज बोरगावकर, डॉ. शेखर शिराढोणकर, डॉ. हेमांशू गुप्ता, डॉ. प्रसाद पुंडे, डॉ. विजय बोरगावकर, डॉ. राजीव मोहगावकर, डॉ. मनीष पुराणिक, डॉ. मधुकर धोंडजी, डॉ. सारंग व्यवहारे, डॉ. वरुण गवळी, डॉ. सी. के. लवांडे, डॉ. रंगनाथ काळे, मनीषा पाटील, योगिता गाडेकर, शीतल वाघमारे.



**ग्रीन सेन्स एनर्जी सिस्टीम प्रा. लि. ...** (डावीकडून) बापूराव राखुंडे, सुभाष चांदणे, रमेश राजोळे, चेतन लोखंडे, मोहन शिखरे, गणेश पारवेकर, अभिलाष चांदणे.



**लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद सिटी ग्रुप...** (डावीकडून) विशाल लदनिया, मनोज पाटणी, चेतन अग्रवाल, सचिन देशमुख, अभिजित जैन (अध्यक्ष), राघवेंद्र बगडिया, शीतल अग्रवाल (कोषाध्यक्ष), अॅड. अनुप धानुका, दीपेश पारकर, हरीश अग्रवाल.

## ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२१०३०७००, ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.

**स्पर्धा**
- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाची साथ



डॉ. शिवाजी सुक्रे

उपअधिष्ठाता : ऐतिहासिक शहराचे होईल सांस्कृतिक दर्शन

# स्पर्धेतून मिळेल सकारात्मक ऊर्जा

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** लोकमत समूहाने गतवर्षीप्रमाणे यावर्षीही महामॅरेथॉन स्पर्धा आयोजित करून शहरात एक वेगळे वातावरण निर्माण केले आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने आरोग्याच्या दृष्टीने प्रत्येकाला सकारात्मक ऊर्जा मिळेल, असे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे (घाटी) उपअधिष्ठाता, तसेच शरीररचनाशास्त्र विभागप्रमुख डॉ. शिवाजी सुक्रे म्हणाले. महामॅरेथॉन स्पर्धेनिमित्त त्यांच्याशी केलेली ही बातचीत.

### महामॅरेथॉन स्पर्धेबद्दल आपले मत काय?

लोकमत समूहाने आयोजित केलेल्या महामॅरेथॉन स्पर्धेच्या निमित्ताने देश-विदेशातील धावपटू, अन्य शहरांतील नागरिक औरंगाबादेत येतील. एक चांगली स्पर्धा औरंगाबादकरांना बघायला मिळेल. स्पर्धेच्या निमित्ताने अन्य शहरातील धावपटूंना, नागरिकांना ऐतिहासिक औरंगाबाद शहराचे, येथील संस्कृतीचे दर्शन घडेल, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. येथील पर्यटनस्थळांची, येथील औद्योगिक तसेच औरंगाबाद शहराची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचेल. त्यांच्यामार्फत इतरांपर्यंत शहराची माहिती जाईल. त्यामुळे महामॅरेथॉन स्पर्धेच्या निमित्ताने औरंगाबादच्या नावलौकिकात आणखी भर पडण्यास हातभार लागणार आहे.

### महामॅरेथॉन स्पर्धेचा काय फायदा होईल?

नियमित धावण्याचे शरीराला अनेक फायदे होतात. शरीराचे आरोग्य सुदृढ राहण्यास हातभार लागतो. वजन नियंत्रणात राहते. हृदयासह शरीरातील अनेक बाबींवर धावण्याचा चांगला परिणाम होतो. आजारांपासून बचाव होण्यास मदत होते. धावण्याची सुरुवात करण्यापूर्वी पुरेशी काळजी घेतली पाहिजे. स्वत:चे आरोग्य सुदृढ ठेवणे, शरीर निरोगी ठेवणे, वजन वाढू नये, असा प्रत्येक व्यक्तीचा उद्देश असतो. महामॅरेथॉन स्पर्धेच्या माध्यमातून अनेकांना त्यासाठी प्रेरणा मिळत आहे. त्यांना सकारात्मक ऊर्जा मिळत आहे. ही प्रेरणा, ऊर्जा घेऊन ते नियमित धावतील. त्यातून शरीरामध्ये सकारात्मक बदल होतील.

### महामॅरेथॉन स्पर्धेत आपण सहभागी होणार आहात का?

ऐतिहासिक औरंगाबाद शहरात लोकमत समूहाने महामॅरेथॉन स्पर्धा आयोजित करून एक वेगळे वातावरण निर्माण केले आहे. या वातावरणात सहभागी होण्यासाठी प्रत्येक जण इच्छुक आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही ही स्पर्धा होत आहे. औरंगाबादसाठी हे मोलाचे पाऊल ठरणार आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (घाटी) डॉक्टर, नर्सिंग स्टाफ आणि इतर कर्मचारी वर्ग स्पर्धेत नक्कीच सहभागी होतील.

विविध स्तरातील, वयोगटातील नागरिक स्पर्धेच्या निमित्ताने एकत्र येतील. त्यांच्यात एकोपा निर्माण होईल, हेदेखील मला आवर्जून सांगावे वाटते.

## सर्वसाधारण सभा पुढे ढकलली

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** महापालिकेची नियमित सर्वसाधारण सभा २ डिसेंबर रोजी सकाळी आयोजित करण्यात आली होती. याच दिवशी मुस्लिम बांधव पैगंबर जयंती साजरी करीत आहेत. सर्वसाधारण सभा पुढे ढकलण्यात यावी, अशी मागणी मुस्लिम नगरसेवकांनी महापौरांकडे केली होती. त्यामुळे महापौर नंदकुमार घोडेले यांनी सभा पुढे ढकलली.

## आज स्थायी समितीची बैठक

**औरंगाबाद :** स्थायी समितीची बैठक गुरुवारी दुपारी ३.३० वाजता आयोजित केली आहे. या बैठकीत प्रशासनातर्फे विविध प्रस्ताव ठेवण्यात आले आहेत. मागील बैठकीत अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेचा मुद्दा नगरसेवकांनी उपस्थित केला होता.

Govt Reg.No.7342
पेन केअर इंस्टीट्युट
ऑर्थोपेडीक सर्जन द्वारे सल्ला व उपचार



सांधेवात, गुडघेदुखी, मान, पाठ,कंबरदुखी मायग्रेन (डोकेदुखी), फ्रोझन शोल्डर (खांदेदुखी) सायटीका, स्लिप डिस्क, टाचदुखी, टेनिस ऐल्बो हातापायात मुंग्या येणे
अपना बाजार, बाफना ज्वेलर्स समोर, जालना रोड, औरंगाबाद.
9822899660, 9422713387, 9767442040
(कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे) सोमवार ते शुक्रवार फक्त

# १२ कोटींच्या निधीमध्ये नांदेडला आधी प्राधान्य

**औरंगाबादला खो :** पर्यटनदृष्ट्या विकासाची नुसती प्रतीक्षा; पुढच्या वर्षीच मिळणार निधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** देश-विदेशातील पर्यटकांना नजरेसमोर ठेवून दक्षिण मध्य रेल्वेतील नांदेड आणि औरंगाबाद रेल्वेस्टेशनच्या विकासासाठी सुमारे १२ कोटींचा निधी मिळणार आहे; परंतु या निधीमध्ये नांदेडला आधी प्राधान्य दिले जात आहे. औरंगाबाद रेल्वेस्टेशनला निधी मिळण्याची नुसती प्रतीक्षा करावी लागत आहे.

देशातील २४ रेल्वेस्टेशनसाठी रेल्वे आणि पर्यटन मंत्रालयाने २४० कोटी रुपये मंजूर केले आहेत. या २४ मध्ये नांदेड आणि औरंगाबाद रेल्वेस्टेशनचा समावेश आहे. या निधीतून प्रवाशांना सोयी-सुविधा देण्यासह जागतिक दर्जाचे रेल्वेस्टेशन बनविण्यावर भर देण्यात येत आहे. जवळपास १२ कोटींचा निधी दोन्ही रेल्वेस्टेशनला देण्यात येणार आहे. यामध्ये आतापर्यंत नांदेड रेल्वेस्टेशनला १ कोटीचा निधी मिळाला आहे; परंतु औरंगाबाद रेल्वेस्टेशनला निधी मिळण्यासाठी नुसतीच वाट बघावी लागत आहे. परिणामी, पर्यटनदृष्ट्या रेल्वेस्टेशनचा विकास करण्यास अडचणी येत आहेत. आगामी आर्थिक वर्षांत औरंगाबाद रेल्वेस्टेशनसाठी पैसे मिळण्यासाठी प्रयत्न केला जात आहेत, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

### दुसऱ्या टप्प्याचीही प्रतीक्षा

मॉडेल रेल्वेस्टेशनच्या पहिल्या टप्प्यात नवीन इमारत उभारण्यात आली आहे, तर दुसऱ्या टप्प्यात जुन्या इमारतीचा विकास केला जाणार आहे; परंतु दोन वर्षांपासून या कामाची प्रतीक्षा केली जात आहे. निधीच्या प्रतीक्षेमुळे हे काम आणखी पुढे ढकलले गेले आहे.



# जर्मन तज्ज्ञांकडून एमआयटीत पाहणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** सिडको येथील एमआयटी महाविद्यालयात सुरू असलेल्या कौशल्य उपक्रमांची पाहणी जर्मनी येथील व्होकेशनल ट्रेनिंग कन्सल्टन्ट सोनिया एन्जलॉविक यांनी पाहणी केली. या पाहणीनंतर त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी अनिता शर्मा, रवी शंकर, प्राचार्य भिलेगावकर, प्राचार्य घुले आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सोनिया एन्जलॉविक म्हणाल्या, भारतात जास्तीत जास्त मुलींना कौशल्य विकास प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. व्होकेशन ट्रेनिंगसोबत इंडस्ट्रीयल ट्रेनिंगची आवश्यकता असून, व्यवसायात यशस्वी होण्यासाठी उत्कृष्ट संभाषण कौशल्य असणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकांचे निरसनही त्यांनी केले. सुरुवातीला प्रा. एम. ए. पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून देत विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रा. श्रीकांत मेनकुदळे यांनी विद्यार्थ्यांनी निर्माण केलेल्या प्रकल्पांची माहिती सादर केली.

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैगिंक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. अॅझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.



आशाकिरण क्लिनीक
१९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521




***स्पर्धेचे नियम व अटी :** 1) ही योजना **औरंगाबाद, जालना आणि बीड जिल्ह्यांतील** लोकमतच्या वाचकांसाठी मर्यादित असून, योजनेचा **कालावधी १०० दिवसांचा** राहील. २) योजनेचा **कालावधी दि. १ डिसेंबर २०१७ ते ११ मार्च २०१८** पर्यंत राहील. यामध्ये एकूण **१०० कूपन** प्रकाशित होतील (**१० मास्टर कूपन्ससह**), त्यापैकी **एकूण ७५ कूपन्स (७० रेग्युलर + ५ मास्टर कूपन्ससह** ) लोकमतच्या अंकातून प्रसिद्ध झालेल्या किंवा लोकमतद्वारा देण्यात आलेल्या प्रवेशिकेवर चिकटवणे बंधनकारक राहील. 3) या योजनेत बदल किंवा संपूर्ण योजना रद्द करण्याचा अधिकार लोकमत व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. 4) या योजनेसंदर्भातील सर्व वाद-विवाद हे औरंगाबाद न्यायालय कक्षेअंतर्गत राहतील. 5) प्रवेशिकेची किंवा कूपनची झेरॉक्स प्रत आढळून आल्यास ती प्रवेशिका बाद करण्यात येईल. 6) एकाच तारखेचे दोन किंवा अधिक कूपन्स ग्राह्य धरले जाणार नाहीत. 7) फाटलेली किंवा खराब अवस्थेतील प्रवेशिका स्वीकारली जाणार नाही. 8) प्रवेशिकेवर स्पर्धकाने आपले नाव, पत्ता, मोबाइल नंबर इत्यादी माहिती लिहून प्रवेशिका एका पाकिटात बंद करून **'विंटर धमाका'** असे पाकिटावर स्पष्ट लिहून प्रवेशिकेचे पाकीट फक्त साधारण पोस्टाने २० मार्च २०१८ पर्यंत पाठवावे. 9) सदरील योजनेची **सोडत व बक्षीस वितरण एप्रिल २०१८ मध्ये** होईल. 10) स्पर्धक योजनेचे पाकीट व्यक्तिशः लोकमत **जिल्हा कार्यालयात** अथवा लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद येथे देऊ शकतात. येणाऱ्या पाकिटांचा ओघ पाहता रजिस्टर पोस्टाद्वारे/कुरिअरद्वारे आलेल्या पाकिटांची पोहोच देता येणार नाही. 11) बक्षिसांच्या वॉरंटी/गॅरंटीची संपूर्ण जबाबदारी त्या-त्या उत्पादकांची राहील, लोकमतची राहणार नाही. 12) शासकीय नियमानुसार रुपये 10,000/- रकमेवरील बक्षिसांसाठी आवश्यक शासकीय (टी.डी.एस., इन्कमटॅक्स वगैरे) कर विजेत्यास भरावा लागेल. संबंधित कराची रक्कम भरल्यानंतरच बक्षीस देण्यात येईल. यासाठी विजेत्याकडे स्वतःचे पॅनकार्ड असणे आवश्यक आहे. 13) लोकमतचे कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना या स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

**विंटर धमाका योजनेची प्रवेशिका १ डिसेंबर २०१७ च्या अंकात प्रकाशित होईल.** | **आजच लोकमत घरी सुरू करा । सहभाग विनामूल्य**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** • औरंगाबाद शहर : प्रताप शिरसाठ - 7385737735 । समीर शेख - 9270452444 । मयूर नखाते - 8483953711 • औरंगाबाद ग्रामीण : नीलेश गिरगावकर - 9922994357, मंगेश कुमठे - 9762889760 • सिडको-हडको: प्रशांत आरक - 9011034582 । गंगाधर पठाडे - 9923685147 • वाळूज-पंढरपूर-पडेगाव : इरफान पठाण - 9823488820 • जालना जिल्हा : किशोर मरकड - 9850361995 • बीड जिल्हा : शेख वाजेद - 7028118313